ePaper


## लोकसभेसाठी बारामतीमधून सुनेत्रा पवार यांनाच उमेदवारी? : अजित पवार



| वर्ष - 7 | अंक - 294 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 11 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- श्रीलंका संघाचं अनोख सेलिब्रेशन!
- मिस वर्ल्ड २०२४ सोहळा
- २०१९ची निवडणूक सर्वात महाग
- क्षमता असेल तरच जागा मागा


## महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी

# एकजुटीने लढू!

## मावळ लोकसभेतील महाविकास आघाडीच्या पदाधिका-यांचा निर्धार

### शिवसेना संपर्क नेते सचिन अहिर यांच्या उपस्थितीत समन्वय बैठक

। पिंपरी । महाईन्यूज

**आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील सर्व राजकीय पक्ष आणि संघटना यांच्या प्रमुख पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्त्यांची समन्वय बैठक आज (रविवारी) पिंपरी चिंचवडमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) संपर्क नेते तथा आमदार सचिन अहिर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी, तसेच देशातील लोकशाहीच्या रक्षणासाठी एकजुटीने लढू आणि मावळ लोकसभेतून महाविकास आघाडीचाच खासदार दिल्लीत पाठवू, असा निर्धार यावेळी सर्वांनी केला.**





पिंपरी चिंचवडमधील या बैठकीला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) मावळ लोकसभा संघटक संजोग वाघेरे पाटील, माजी आमदार तथा जिल्हा प्रमुख ॲड. गौतम चाबुकस्वार, शहर प्रमुख ॲड. सचिन भोसले, कॉंग्रेस शहराध्यक्ष कैलास कदम, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे, स्वराज इंडिया पक्षाचे मानव कांबळे, माजी महापौर कविचंद भाट, माजी नगरसेवक मारुती भापकर, बाबू नायर, आम आदमी पार्टी शहराध्यक्षा मीना जावळे, संभाजी ब्रिगेड शहराध्यक्ष प्रवीण कदम, माकप शहराध्यक्ष गणेश जराडे, कॉंग्रेस महिला नेत्या निगार बारस्कर, शामला सोनवणे, अनिता तुतारे, राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला शहराध्यक्षा ज्योती निंबाळकर, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) युवा अधिकारी चेतन पवार, माजी शहराध्यक्ष योगेश बाबर, चिंचवड विधानसभा प्रमुख अनंत को-हाळे, पिंपरी विधानसभा प्रमुख तुषार नवले, मराठा महासंघाचे प्रकाश जाधव, बारा बलुतेदार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रताप गुरव आदींसह महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षाचे मावळ लोकसभा मतदारसंघातील पदाधिकारी, विधानसभा प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

### संजोग वाघेरे पाटील हेच विजयी होऊन लोकसभेत जातील...

**शिवसेनेवर आलेल्या संकटांतर देखील आपले नेते उद्धव ठाकरे रोखठोक भूमिका घेऊन लढत आहेत. त्यामुळे मावळ लोकसभा मतदारसंघातून उध्दव ठाकरे यांनी संजोग वाघेरे पाटील यांना जबाबदारी दिली आहे. त्यामुळे उध्दव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली काम करणारे, त्यांचे शिलेदार म्हणून संजोग वाघेरे पाटील हेच विजयी होऊन लोकसभेत जातील, अशी भावना यावेळी उपस्थित महाविकास आघाडीच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी मांडली.**

## नरेंद्र मोदींच्या विरोधात हजारो उमेदवार उभे करणार

### मराठा क्रांती मोर्चाच्या बैठकीत सर्वानुमते निर्णय

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांनी येत्या चार दिवसात 'सगे सोयरे' बाबतच्या अधिसूचनेचे कायद्यात रूपांतर करावे, अन्यथा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात कमीत कमी एक हजार उमेदवार उभे करून मराठा आरक्षणाच्या प्रश्नासंदर्भात आजवर गप्प बसलेल्या पंतप्रधानांचे लक्ष वेधणार असल्याचे मराठा क्रांती मोर्चाच्या बैठकीत सर्वानुमते जाहीर करण्यात आले.**

मराठा क्रांती मोर्चा व सकल मराठा समाज पुणे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची रविवार (दि.१०) बैठक भोईर व्यायाम शाळा चिंचवडगाव येथे शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीसाठी मारुती भापकर, मनोहर वाडेकर, प्रकाश जाधव, सतीश काळे, जीवन बोराडे, धनाजी येळकर, नकुल भोईर, वैभव जाधव, वसंत पाटील, संजय जाधव, अभिषेक म्हसे, सचिन पवार, शिवाजी पाडुळे, गणेश देवराम, ब्रह्मानंद जाधव, अमोल ढोरे, यांच्या सह अनेकजण उपस्थित होते.मनोज जरांगे पाटील यांना नवी मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्र सरकारच्या वतीने 'सगे सोयरे' बाबतची अधिसूचना काढून आंदोलन स्थगित करावयास लावले. सदरच्या अधिसूचनेचे कायद्यात रूपांतर करण्याचे वचन लाखो मराठा आंदोलकांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. १६ फेब्रुवारी पर्यंत यावर हरकती मागवण्यात आल्या, त्याची मुदत संपून तीन आठवडे झाले. तरी महाराष्ट्र सरकारने कायद्यात रूपांतर केले नाही.



### मंत्र्यांना घेराव घालून जाब विचारणार

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांनी येत्या चार दिवसात सदर अधिसूचनेचे कायद्यात रूपांतर करावे, अन्यथा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात कमीत कमी एक हजार उमेदवार उभे करून मराठा आरक्षणाच्या प्रश्नासंदर्भात आजवर गप्प बसलेल्या पंतप्रधानांचे लक्ष वेधणार. या बैठकीत सर्वानुमते जाहीर करण्यात आले. आचारसंहिता लागू होण्यापूर्वी पिंपरी चिंचवड शहरात व पुणे जिल्ह्यात येणाऱ्या मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्या सह सर्व मंत्र्यांना घेराव घालून जाब विचारणार असल्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

# दोन 'दादां'नीच नगरसेवक निवडून आणले

## सुप्रिया सुळेंसमोर अजित पवार यांचे खोचक विधान!

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यापासून दोन्ही गटांनी एकमेकांवर टीका करण्याची एकही संधी सोडलेली नाही. आता आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कुणाला निवडून येण्यासाठी कुणी मदत केली आणि कुणासाठी कुणी प्रचारसभा घेतल्या या मुद्द्यांवरून दोन्ही गटांमध्ये दावे-प्रतिदावे होताना पाहायला मिळत आहेत. यासंदर्भात आज अजित पवार यांनी पुण्यातील एका कार्यक्रमात बोलताना केलेलं सूचक विधान चर्चेचा विषय ठरलं आहे.**



विशेष म्हणजे व्यासपीठावर खासदार सुप्रिया सुळे उपस्थित असताना त्यांनी हे विधान केल्यामुळे राजकीय तर्त-वितर्कांना उधाण आलं आहे.राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांमध्ये सुंदोपसुंदी चालू असताना पुण्यात नगरसेवकांना कुणी निवडून आणलं, हा मुद्दा अजित पवारांनी उपस्थित केला. "इथे मीच अनेक नगरसेवकांना निवडून आणलंय. काहींना चंद्रकांत पाटलांनी निवडून आणलंय. म्हणजे दोन्ही दादांनीच लोकं निवडून आणली आहेत. बाकी कुणी आलेलं नव्हतं. एकतर भाजपाचे तरी दादा किंवा राष्ट्रवादीचे तरी दादा", असं अजित पवार म्हणाले."इथल्या आरोग्य व्यवस्थेबाबत इतरांनीही प्रयत्न केला. पण त्या काळात कुणालाच हे रेटलं नाही. दोन वर्षांत आम्ही ठरवलं. मी देवेंद्र फडणवीसांना म्हणालो की आपल्याला मर्यादित वेळेत हे करायचंय. त्यातून मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचा पर्याय पुढे आला", असंही अजित पवारांनी नमूद केलं. तसेच, भाषणाच्या शेवटी "तिसऱ्यांदा नरेंद्र मोदींना निवडून आणायचंय", असंही ते म्हणाले.

दरम्यान, अजित पवारांनी भाषणात मांडलेल्या मुद्द्यावर सुप्रिया सुळेंनी नंतर माध्यमांशी बोलताना उत्तर दिलं. "पुण्यात पक्षाची जबाबदारी त्यांच्याकडेच होती. हीच शरद पवारांची खासियत आहे. शरद पवारांनी खूप तरुण टीम उभी केली. सत्तेचं विकेंद्रीकरण केलं. शरद पवारांनी त्या त्या जिल्ह्याची जबाबदारी असणाऱ्या व्यक्तीला पूर्ण निर्णय स्वातंत्र्य दिलं होतं. प्रचाराला आम्ही सगळेच आलो होतो. पण निर्णय प्रक्रियेत कधीही ढवळाढवळ केली नाही

### एकाच व्यासपीठावर, तरीही संवाद नाही

» संपूर्ण कार्यक्रमात अजित पवार व सुप्रिया सुळे यांच्यात कोणताही संवाद झाल्याचं पाहायला मिळालं नाही. यासंदर्भात बोलताना सुप्रिया सुळेंनी नंतर "ते गडबडीत होते, त्यांना पुढच्या कार्यक्रमाला जायचं होतं त्यामुळे बोलायची संधीच मिळाली नाही", असं विधानही केलं.राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यापासून दोन्ही गटांनी एकमेकांवर टीका करण्याची एकही संधी सोडलेली नाही. आता आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कुणाला निवडून येण्यासाठी कुणी मदत केली आणि कुणासाठी कुणी प्रचारसभा घेतल्या या मुद्द्यांवरून दोन्ही गटांमध्ये दावे-प्रतिदावे होताना पाहायला मिळत आहेत. आपल्या भाषणात सुप्रिया सुळेंनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरात लवकर घ्याव्यात, अशी मागणी राज्य सरकारकडे केली. त्यापाठोपाठ लागलीच अजित पवारांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीलाच "या निवडणुका राज्य सरकारमुळे नव्हेत, तर सर्वोच्च न्यायालयातील ओबीसीसंदर्भातल्या प्रलंबित मुद्द्यामुळे झालेल्या नाहीत", असं स्पष्टीकरण दिलं. त्यामुळे दोघांमध्ये प्रत्यक्ष संवाद झालेला नसला, तरी अशा प्रकारे अप्रत्यक्ष सवाल-जवाब मात्र रंगल्याचं पाहायला मिळालं.

हे आज सिद्ध झालं. मी अजित पवारांचे आभार मानते की त्यांनी यावर स्पष्टीकरण दिलं की त्यांना निर्णयांचं किती स्वातंत्र्य होतं आणि त्यानुसार ते निवडणुका लढले", अशी खोचक प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिली.पुण्यात मल्टिस्पेशालिटी हीलिंग हॉस्पिटलच्या भूमिपूजन सोहळ्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे, कॅबिनेट मंत्री चंद्रकांत पाटील आदी नेतेमंडळी उपस्थित होती. यावेळी व्यासपीठावर सुप्रिया सुळे व अजित पवारांच्या मधल्या खुर्चीवर देवेंद्र फडणवीस बसले होते.

---

# ३७५ खाटांच्या मल्टिस्पेशालिटी रुग्णालयाचे भूमीपूजन

## उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**समाविष्ट ३४ गावांतील मिळकतकर शास्तीकराचा (दंड) प्रश्न पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या धर्तीवर सोडविला जाईल. तोपर्यंत शास्तीकराची आकारणी करण्यात येऊ नये, अशी सूचना महापालिकेला करण्यात आली आहे.**

यासंदर्भातील शासन निर्णय लवकरच घेतला जाईल, असे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. तर, वारजे येथील पोलीस ठाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठीची आरक्षित जागा तातडीने देण्याची सूचना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांना केली.वारजे येथील ३७५ खाटांच्या मल्टिस्पेशालिटी रुग्णालयाचे भूमीपूजन उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्यांनी ही ग्वाही दिली. खासदार सुप्रिया सुळे, राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार भीमराव तापकीर, आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांच्यासह भाजप-राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक उपस्थित होते.आमदार भीमराव तापकीर यांनी समाविष्ट गावातील मिळकतकर आणि पोलीस ठाण्याच्या जागेच्या प्रश्नासंदर्भात पवार आणि फडणवीस यांचे लक्ष वेधले. त्यावेळी त्यांनी ही ग्वाही दिली. अजित पवार म्हणाले की, शहरातील आरोग्याच्या गंभीर प्रश्नासंदर्भात वैद्यकीय सुसज्जता



हवी, हे करोना संकट काळात अधोरेखित झाले. त्यातूनच वारज्यात सुसज्ज रुग्णालय उभारणीचा निर्णय पुढे आला. या रुग्णालयातील ३७५ खाटांपैकी १० टक्के खाटा गरजूंना विनामूल्य दिल्या जाणार आहेत. तर सहा टक्के खाटां शासकीय दराने उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. बाणेर येथेही ७५० खाटांचे अत्याधुनिक रुग्णालय उभारणीचे कामही सुरू आहे. समाविष्ट ३४ गावांतील मिळकतकरासंदर्भात काही दिवसांपूर्वी बैठक झाली. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या धर्तीवर समाविष्ट गावासंदर्भात निर्णय घेतला जाईल. त्यामुळे लोकांना त्रास देऊ नका, मिळकतकराची थकबाकी वसूल करू नका, अशी सूचना महापालिका आयुक्तांना

### शास्तीकराची आकारणी करू नये

» पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका, ग्रामीण भाग पुण्याचे ग्रोथ इंजिन आहे. त्यामुळे शहराच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष दिले जात आहे. त्यातूनच अनेक प्रश्न मार्गी लावण्यात येत आहेत. वारजेतील पोलीस ठाण्याच्या जागेसंदर्भातील प्रश्नही तातडीने सोडविण्यात येईल. ही जागा पोलीस ठाण्यासाठी आरक्षित आहे. त्यामुळे त्यावर महापालिकेने तातडीने कार्यवाही कराव, अशी सूचना फडणवीस यांनी केली.समाविष्ट ३४ गावांतील मिळकतकर शास्तीकराचा (दंड) प्रश्न पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या धर्तीवर सोडविला जाईल. तोपर्यंत शास्तीकराची आकारणी करण्यात येऊ नये, अशी सूचना महापालिकेला करण्यात आली आहे.

करण्यात आली आहे. त्यामुळे निवडणुकीच्या काळात कोणी काही सांगितले, तर त्याच्यावर विश्वास ठेवू नका. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासमवेत याबाबत लवकरच बैठक घेण्यात येईल. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागली तर ती संपल्यानंतर त्याबाबतचा शासकीय निर्णय तातडीने घेतला जाईल, असे पवार यांनी स्पष्ट केले.या रुग्णालयाच्या माध्यमातून सुसज्ज वैद्यकीय सेवा उपलब्ध होणार आहे. त्यासाठी जर्मनी आणि नेदरलॅण्ड या राष्ट्रांनी मदत केली आहे. देशातील असा हा पहिला प्रयोग पुण्यात होत आहे.

## आयुक्त शेखर सिंह यांना भूमिपुत्र, माजी नगरसेवकांचा विसर!

# आमदार महेश लांडगे यांनी आयुक्तांचे "कान टोचले" !

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समोर प्रशासनाला खडसावले

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भोसरी मतदार संघातील विविध विकास प्रकल्पांच्या कामाच्या लोकार्पण व भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समोरच आमदार महेश लांडगे यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांचे कान टोचले आहेत.**



पिंपरी- चिंचवड महापालिकेमध्ये प्रशासक राजवट सुरू आहे. प्रशासक व आयुक्त शेखर सिंह लोकप्रतिनिधी आणि स्थानिक नेत्यांना विश्वासात घेत नाहीत, असा सूर आहे. यबाबत माजी नगरसेवक वारंवार तक्रार करत आहेत. त्यात आता थेट उपमुख्यमंत्री समोरच आयुक्तांची कान उघडणी केल्यामुळे प्रशासन व महापालिका अधिकाऱ्यांमध्ये चर्चा रंगली आहे.

चिखली येथील नवीन टाऊन हॉलमध्ये आयोजित विकासकामांच्या लोकार्पण व भूमिपूजन सोहळ्यावेळी आयुक्त सिंह यांनी प्रास्ताविक केले. त्यामध्ये त्यांनी विकासकामांचा खर्च, कामाची आवश्यकता याबाबत माहिती विषद केली. मात्र, ज्या नागरिकांनी विकासकामांसाठी जमिनी दिल्या. तसेच ज्या माजी नगरसेवकांनी कामे सुचवली त्यांची नावे घेतली नाही. त्यामुळे चिडलेल्या आमदार लांडगे यांनी आयुक्त सिंह यांचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोरच समाचार घेतला.

आमदार लांडगे म्हणाले की, "सगळी कामे प्रशासन एकटेच करत नाही. प्रशासनाने सगळी कामे केली असती तर ही कामे दहा वर्षांपूर्वीच झाली असती. सन १९९७ ला गावे महापालिकेत समाविष्ट झाली. सन २०१७ नंतर जे नगरसेवक निवडून आले त्यांनी परिसरात विविध कामे सुचवली. तसेच, विविध प्रकल्प उभे राहण्यासाठी येथील भूमिपुत्रांनी जमिनी दिल्या. मात्र, प्रशासकांनी त्यांचा साधा नामोल्लेखही केला नाही. मी त्या सर्व माजी नगरसेवक, लोकप्रतिनिधी आणि भूमिपुत्रांचे आभार व्यक्त करतो.." असे जाहीरपणे आमदार लांडगे यांनी आयुक्तांना सुनावले. त्यामुळे कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या चिखलीतील ग्रामस्थांनी लांडगे यांच्या भूमिकेचे टाळ्या वाजवून कौतुक केले.

### विकासकामात लोकप्रतिनिधींना विश्वासात घ्या : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**» राज्यातील महापालिकांच्या दोन वर्षांपासून निवडणुका झालेल्या नाहीत. शहराच्या विकासाचा कारभार प्रशासक करत आहेत. शहरांचा विकास हा प्रशासन आणि लोकप्रतिनिधी या दोन चाकांवर चालत असतो. त्यामुळे विकासाच्या कामाला अधिक गती प्राप्त होते. त्यामुळे माजी नगरसेवक, लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊनच कामे केली जावीत, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयुक्तांना बजावले. विशेष म्हणजे, आमदार महेश लांडगे यांनी पिंपरी चिंचवडच्या विकासासाठी सुचवलेली एक हजार नव्हे, तर आणखी पाच हजार कोटीची विकासकामे आणि मार्गी लावण्यास तयार आहोत, असे जाहीरपणे स्पष्ट करत लांडगे यांच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभा असल्यावर शिक्कामोर्तब केले.**

---

## जागतिक महिला दिनानिमित्त पिंपळेगुरव मध्ये 'मशाल मार्च'

### स्त्रीचा आभिमान आणि स्वाभिमान कर्तृत्त्वाची जाणीव व्हावी म्हणून मशाल मार्चचे आयोजन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जागतिक महिला दिनानिमित्त पिंपळे गुरव येथे तुळजाभवानी मंदिर ते राजमाता जिजाऊ उद्यान पर्यंत मशाल मार्च रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी स्त्री म्हणजे राख नही, धगधगता अंगार है.. स्त्रीचा आभिमान आणि स्वाभिमान कर्तृत्त्वाची जाणीव व्हावी म्हणून मशाल मार्चचे आयोजन केले होते.**




यावेळी मानवी हक्क संरक्षण आणि जागृतीचे शहराध्यक्ष आण्णा जोगदंड म्हणाले कि, महिला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यासाठी प्रत्येक क्षेत्रात पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून आत्मविश्वासने व धाडसाने कार्यरत आहेत. तसं पाहिलं तर खुरपणीपासून ते नासापर्यंत आणि राष्ट्रपती पदापर्यंत महिला कार्यरत आहेत. कोणत्याही क्षेत्रात महिला मागे राहीलेल्या नाहीत.

रामेश्वर महाजन बेसिक टिमचे सिटी इनचार्ज म्हणाले कि, जीच्या उदरातून जन्म घेते दुनिया सारी, त्या विश्व शक्तीचे नाव आहे नारी.. हे नारी तु घे भरारी, बघेन कौतुकाने दुनिया सारी..असे म्हटले आहे. यावेळी राजमाता जिजाऊ उद्यानच्या समोरच पटनाट्यातून जनजागृती केली.

#### महिला व नागरिक सहभागी

याप्रसंगी कु.अर्वी कांबळे या मुलीने मर्दानी खेळ खेळून उपस्थितीतांचे मन जिंकली. यावेळी सडक सुरक्षा सप्ताह निमित्त सर्वांना आण्णा जोगदंड यांनी सुरक्षितेची शपथ तर पर्यावरणाची जयश्री आरणे यांनी शपथ देऊन मशाल रॅलीची सांगता करण्यात आली. यावेळी मुख्य आरोग्य निरीक्षक, वाय. बी. फल्ले, मानवी हक्क संरक्षण आणि जागृतीचे शहराध्यक्ष आण्णा जोगदंड, मानवी हक्क संरक्षण आणि जागृतीच्या पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा संगिता जोगदंड, मराठवाडा जनविकास संघाचे अध्यक्ष व वृक्षमित्र अरूण पवार, माजी नगरसेवक महेश जगताप, राजू लोखंडे, सागर अंघोळकर, चंदाताई लोखंडे, उषाताई मुंढे, सुरेश सकट, राजू ओव्हाळ, मुकादम, सिद्धार्थ जगताप अशोक सोनटक्के बेसिक सिटी इनचार्ज, रामेश्वर महाजन, वॉर्ड इनचार्ज स्वराज कांबळे, निकेश सरवदे, समाधान कांबळे, मारुती कांबळे, दीपक चौर, राहुल जाधव, राहुल चव्हाण, ऋतुजा पेडणेकर, डॉ भूषण पेडणेकर, पल्लवी भाटे अनेक महिला व नागरिक सहभागी झाले होते.

# लोकशाहीचा उत्सव ‘साजरा’ व्हावा!



**भूमिका**

**निवडणूक आयोग या आठवड्यात लोकसभा निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर करेल, अशी शक्यता दिसते. मागच्या लोकसभा निवडणुकांच्या वेळी पंतप्रधानांच्या परदेश दौऱ्यांच्या वेळा सांभाळत वेळापत्रक तयार करण्यात आल्याची टीका झाली होती. यावेळी तरी वेळापत्रक अधिक तर्कशुद्ध असेल का, याचे उत्तर लवकरच मिळेल.**

निवडणूक प्रक्रियेत अनेक त्रुटी आहेत. पहिली त्रुटी म्हणजे मतदानाच्या टप्प्यांची मोठी संख्या. कोणत्याही देशात मतदानाचे तीनपेक्षा अधिक टप्पे असता कामा नयेत आणि एका राज्यातील मतदान एकाच दिवशी झाले पाहिजे. मोठ्या राज्यांत ते दोन टप्प्यांत घेणे समजण्यासारखे आहे, पण २०१९च्या लोकसभा निवडणुकीचे वेळापत्रक तब्बल ३९ दिवसांचे होते- ११ एप्रिल ते १९ मे. बिहारमध्ये ४० जागांसाठी, उत्तर प्रदेशात ८० जागांसाठी आणि पश्चिम बंगालमध्ये ४२ जागांसाठी सात टप्प्यांत मतदान झाले. तमिळनाडू (३९) आणि पुदुच्चेरीमध्ये (१) मिळून साधारण बिहार किंवा पश्चिम बंगालएवढेच मतदारसंघ होते. तरीही मतदान एकाच दिवसात पार पडले. अवघे २९ मतदारसंघ असलेल्या मध्य प्रदेशात चार टप्प्यांत मतदान प्रक्रिया राबवण्याची गरज का पडली? उत्तर प्रदेशात तमिळनाडूच्या दुप्पट मतदारसंघ असताना मतदानासाठी सात टप्पे का लागले? सुरक्षेच्या



कारणास्तव असे वेळापत्रक तयार केले जाते, केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाला (सीएपीएफएस) राज्याच्या एका भागातून दुसऱ्या भागात नेण्यास वेळ लागतो, अशी कारणे देण्यात येतात. ही कारणे अजिबात पटण्यासारखी नाहीत. निवडणुका जाहीर झाल्या की, राज्याच्या सर्वच मतदारसंघांत पोलीस आणि सीएपीएफएसचे जवान तैनात केले जातात. पहिल्या टप्प्यातील मतदान सुरू असते, तेव्हा त्या टप्प्यातील मतदारसंघ वगळता अन्यत्र प्रचार सुरू असतोच आणि तिथे कायदा आणि सुव्यवस्था कायम राखण्यासाठी पोलीस व सीएपीएफएसचे जवान तैनात असतातच. मतदानाच्या आदल्या आणि नंतरच्या दिवशी मतदारसंघांत पोलीस बंदोबस्त नसतो असे नाही. याशिवाय, बिहार आणि उत्तर प्रदेशात डबल इंजिन सरकार आहे आणि त्यामुळे भाजपच्या म्हणण्यानुसार तिथे कायदा व सुव्यवस्थेत कमालीची सुधारणा झाली असणारच. प्रत्यक्षात सुरक्षा दलांची नव्हे, तर नेते आणि कार्यकर्त्यांची एका भागातून दुसऱ्या भागात ने- आण करणे शक्य व्हावे, हेच मतदान अनेक टप्प्यांत घेण्यामागचे खरे कारण असावे, असा संयश येतो. अर्थात अनेक टप्प्यांत मतदान घेण्याचे बरेच नकारात्मक परिणाम होऊ शकतात. पहिला मुद्दा येतो ‘शांतता कालावधी’चा. नियमानुसार मतदानाच्या ४८ तास आधी प्रचार थांबविण्यात येतो. समजा ‘अ’ मतदारसंघात प्रचाराच्या तोफा थंडावल्या आहेत. मात्र ‘ब’ मतदारसंघात मतदानाची तारीख वेगळी असल्यामुळे तिथे प्रचार सुरू आहे. अशावेळी ‘ब’ मतदारसंघात प्रचारादरम्यान केलेली भाषणे त्याच मतदारसंघापुरती सीमित राहतील का? शक्यच नाही! ती टीव्ही, रेडिओ, वर्तमानपत्रे आणि समाजमाध्यमांतून ‘अ’ मतदारसंघांत पोहोचतात. त्याचा प्रभाव तेथील मतदानावर पडू शकतो. दुसरा नकारात्मक परिणाम असा की, एका टप्प्यातील मतदान संपल्यानंतर केल्या जाणाऱ्या सर्वेक्षणांच्या निकालांचा प्रभाव दुसऱ्या आणि त्यापुढच्या टप्प्यांतील मतदानावर पडू शकतो.आणखी एका मुद्द्याची निवडणूक आयोगाने गांभीर्याने दखल घेणे अपेक्षित आहे. तो मुद्दा म्हणजे संबंधित राज्यात निवडणूक आयोगाचे प्रतिनिधी म्हणून काम करणाऱ्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडून नियम लागू करण्यात केली जाणारी मनमानी. उदाहरणार्थ, २०१९मध्ये तमिळनाडूत मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी नगर पंचायती आणि नगरपालिकांमध्ये फलक, फ्लेक्स, बॅनर आणि झेंडे लावण्यावर बंदी घातली होती. प्रचारफेरीसाठी प्रति उमेदवार एक दिवस निश्चित करण्यात आला होता. त्या दिवसाव्यतिरिक्त अन्य दिवशी प्रचारफेऱ्यांवर बंदी घालण्यात आली होती. उमेदवार मतदारांना कोणत्या ठिकाणी संबोधित करू शकतो, हेदेखील ठरवून देण्यात आले होते. उमेदवाराबरोबर तीनपेक्षा अधिक वाहने असता कामा नयेत, सभापरिसरात झेंडे लावण्याची परवानगी प्रचारसभेचा दिवस आणि त्याच्या आधीचा व नंतरचा प्रत्येक एक दिवस अशा तीन दिवसांपुरतीच देण्यात आली होती.

## संपादकीय »

### उठाठेव कशाला?

***स्त्रीने आपले नाव काय ठेवायचे, ते बदलायचे की नाही, या जुन्या झालेल्या मुद्द्यांमध्ये सरकारी यंत्रणांनी कशाला नाक खुपसावे ?***

काही काळापूर्वी एखाद्या विवाहित स्त्रीला काहीही विचारले, तरी ‘आमच्या ह्यांना विचारून सांगते’, असे उत्तर येत असे. साध्या भाजीखरेदीपासून ते अगदी घर किंवा सोन्याच्या खरेदीपर्यंत कशालाही हेच उत्तर दिले जायचे. अगदी स्वयंपाकाची भांडी खरेदी करायला गेल्यावरही ज्या भांड्याला नवऱ्याचा स्वयंपाकघरात कधी हातही लागणार नसे, त्या भांड्यावरही स्त्रिया आवर्जून नवऱ्याचेच नाव घालत. एवढेच नाही, तर मालक, धनी, साहेब अशा वर्चस्ववाचक शब्दांनीच नवऱ्याचा उल्लेख केला जात असे. असे तुम्हाला वाटत असेल तर ते साफ चूक आहे. महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे यांनी आपल्या अथक परिश्रमातून चिखलात रुतलेला स्त्रीजीवनाचा जो गाडा बाहेर काढला, तो पुन्हा त्याच चिखलात ढकलण्याचे, काळाची चाके पुन्हा उलटी फिरवण्याचे प्रयत्न अगदी थेट सरकारी पातळीवरून सुरू आहेत.

‘आदिवासींना त्यांच्या हक्काच्या नोकऱ्या मिळत नाहीत तेव्हा, त्यांच्या भागातील शाळा बंद पडतात, त्यांची आंदोलने चिरडली जातात, तेव्हा आपण कुठे असता..?’ असा प्रश्न करत ‘उत्तरदायित्वाच्या निश्चिततेचे ऐतिहासिक पाऊल’ या विवेक पंडित यांच्या लेखाला (३ मार्च २०२४) प्रत्युत्तर देणारे टिपण..

# आदिवासी होरपळतात, तेव्हा तुम्ही कुठे असता?

उत्तरदायित्वाच्या निश्चिततेचे ऐतिहासिक पाऊल’ हा लेख वाचल्यानंतर माझ्या मनात पहिला मुद्दा उपस्थित झाला की, देशात जे काही झाले ते २०१४ नंतरच झाले आणि होत आहे. त्यापूर्वी काहीच झाले नाही. दुसरा- भारताच्या इतिहासाचे पुनर्लेखन करण्याची जी होड लागली आणि त्याचे नायक कोण हे सांगायची अहमहमिका चालली ही. हे एकदा मनात निश्चित केले की पुढचे काम अगदीच सोपे होऊन जाते. लेखकाने हेच गृहीतक धरून संपूर्ण लेखन केल्याचे दिसते. लेखक स्वत: १९७० च्या दशकाच्या उत्तरार्धापासून सामाजिक क्षेत्रात काम करत आहेत. ते स्वत: एका संघटनेचे संस्थापक आहेत.

त्या संघटनेमार्फत ते ठाणे जिल्ह्यातील पश्चिम भागात आदिवासींमध्ये कार्यरत आहेत. ते जेव्हा या सामाजिक क्षेत्रात आले तेव्हाही शासन यंत्रणा अस्तित्वात होती व ती यंत्रणा नियंत्रित करणारी नोकरशाही व राजकीय पक्षही होते व आहेत. त्यामुळे



त्यांना नोकरशाही व राजकीय पक्ष यांचे उत्तरदायित्व काय आहे हे नक्कीच ज्ञात आहे. या उत्तरदायित्वामुळेच लेखकाच्या वेगवेगळ्या लढ्यांना यश आले. तसे नसते तर ते निराश झाले असते. लेखकाने आदिवासींविषयी प्रश्न उपस्थित केले आहेत.

त्यांच्याबाबत शासन फारच उदासीन आहे त्यामुळे आदिवासी अद्यापही मागासच राहिला आहे, अशी प्रतिमा लेखकाने उभी केली आहे, असे वाटते. १) महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर आदिवासींकरिता स्वतंत्र मंत्रालय नव्हते. १९७२ मध्ये समाजकल्याण विभागांतर्गत आदिवासी विकास संचालनालयाची स्थापना झाली. १९७६ मध्ये आदिवासी विकास आयुक्तालय सुरू झाले. २२ एप्रिल १९८३ मध्ये स्वतंत्रपणे आदिवासी विकास विभागाची निर्मिती झाली व १९८४ मध्ये या आदिवासी विकास विभागाचे रीतसर काम सुरू झाले. १९७२ मध्ये स्थापन झालेल्या आदिवासी विकास संचालनालयाचे १९९२ मध्ये आदिवासी आयुक्तालयात विलीनीकरण करण्यात आले. पुढे याचे विकेंद्रीकरण करून नागपूर, अमरावती, नाशिक, ठाणे अशा चार अप्पर आयुक्त कार्यालयांची निर्मिती झाली. ही रचना लक्षात घेतली तर सरकार म्हणून उत्तरदायित्वाची भूमिका स्पष्ट होऊ शकते. २) महाराष्ट्रात एकूण लोकसंख्येच्या ९.३५ टक्के एवढी आदिवासींची संख्या आहे. त्यात एकूण ४५ जमाती आहेत. त्यापैकी माडिया, कोलाम, कातकरी या जमाती अतिमागास जमाती म्हणून गणल्या जातात. आदिवासी मुख्यत्वे विदर्भातील अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, खानदेशातील धुळे, नंदूरबार, जळगाव, नाशिक आणि ठाणे व पालघर जिल्ह्यात आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मोदी महाराष्ट्रातून निवडणूक लढणार!

## संजय राऊत : ईव्हीएम तयार करणाऱ्या कंपनीत भाजपाचे संचालक

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करत असताना शिवसेना उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी आजच्या पत्रकार परिषदेत एक खळबळजनक दावा केला. आमच्यावर बोलण्याआधी तुमचे जागावाटप निस्तरा, असे आव्हान संजय राऊत यांनी दिले आहे. "भाजपाबरोबरच्या दोन कचऱ्याच्या डंपरमुळे त्यांच्याहातून महाराष्ट्र निसटत आहे. त्यामुळे भाजपाचे लोक नरेंद्र मोदी यांना महाराष्ट्रातून निवडणूक लढविण्यास सांगत आहेत.**



जेणेकरून मोदी जर महाराष्ट्रातून लढले तर भाजपाला दोन-चार जागा मिळू शकतील. नितीन गडकरींचे तिकिट कापून, त्यांचा काटा काढून नागपूर किंवा पुण्यातून लढण्याचा पंतप्रधान मोदींचा विचार आहे. उद्धव ठाकरे, शरद पवार आणि काँग्रेस एकत्र येऊन ४० हून अधिक जागा जिंकत आहेत. म्हणून मोदींना महाराष्ट्रात आणून निवडणूक लढविण्याची गळ घातली जात आहे", असा दावा संजय राऊत यांनी केला."मी फडणवीस यांना पुन्हा सांगतो, संत तुकाराम यांचे अभंग त्यांनी मनापासून वाचावेत. 'ऐसा नरा, मोजुनी माराव्या पैजारा...' हा अभंग बेईमान लोकांसाठी आहे", असेही संजय राऊत यांनी सांगितले. निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त अरुण गोयल यांनी तडकाफडकी राजीनामा दिल्यानंतर संजय राऊत यांनी टीका केली आहे. "निवडणूक आयोग हा भाजपाच्या इशाऱ्यावर काम करत आहे. राज्यपाल जसे भाजपाशी संबंधित असलेले निवडले जातात. तसेच भाजपाचे कोणतेतरी कार्यकर्ते निवडणूक आयोगावर नेमले जातील. निवडणूक आयोग तटस्थ आणि निष्पक्ष असतो, आयोगाने संविधानानुसार काम केले पाहीजे. मागच्या १० वर्षात निवडणूक आयोगाचेही खासगीकरण झालेले असून ती भाजपाची एक शाखा बनली आहे", अशी टीका संजय राऊत यांनी केली.टीएन शेषन यांच्या काळात असलेला निष्पक्ष निवडणूक आयोग राहिलेला नाही. ईव्हीएम बनिवणाऱ्या कंपनीमध्ये भाजपाचे लोक संचालक म्हणून काम करू शकतात. तर भाजपाचे दोन कार्यकर्ते निवडणूक आयोगाच्या रिकाम्या जागी काम करतील", असेही संजय राऊत म्हणाले.संजय राऊत पुढे म्हणाले, "शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बाबतीत निवडणूक आयोगाने जे निर्णय घेतले किंवा त्यांना घ्यायला लावले, ते असंवैधानिक होते. दहाव्या परिशिष्टाची मोडतोड आणि पक्षांतरी बंदी कायद्याचे उल्लंघन झालेले असताना हाच निवडणूक आयोग धृतराष्ट्राप्रमाणे डोळे मिटून बसला होता. निवडणूक आयोग असला काय किंवा नसला काय या देशाला काही फरक पडत नाही. अरुण गोयल यांच्या राजीनाम्यामागे मोदी-शाह यांचा काहीतरी डाव असेल. मुळात अरुण गोयल यांची नेमणूकच अनैतिक होती, त्यामुळे ते नैतिक कारणांसाठी राजीनामा देतील, यावर माझा विश्वास नाही. ज्यांनी त्यांना नेमले त्यांनीच बाजूला केले. आता त्यांच्या जागी आणखी उपयुक्त असलेली व्यक्ती नेमली जाईल."देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या टीकेलाही संजय राऊत यांनी उत्तर दिले. "फडणवीस वैफल्यग्रस्त असून निराश झालेले व्यक्ती आहेत. भाजपाची निती चिखलात लोळण्याची आहे. आमच्याबरोबर असताना ते स्वर्गसुखाचा आनंद घेत होते. आज मात्र त्यांच्याबाजूला दोन डबकी आहेत, त्यात ते लोळत आहेत. उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्रात एक तुफान निर्माण केलं आहे. याची त्यांना भिती वाटते. ज्यांच्या कचऱ्याच्या डपंरमध्ये बसून भाजपाचा प्रवास सुरू आहे.

### वडणूक आयोगाचेही खासगीकरण

» मात्र महाराष्ट्र हे डम्पिंग ग्राऊंड हा सगळा कचरा या डपंरसह महाराष्ट्राच्या बाहेर गुजरातमध्ये नेऊन टाकणार आहोत, हे आज मी देवेंद्र फडणवीस यांना सांगू इच्छितो", असा इशारा संजय राऊत यांनी दिला.जेणेकरून मोदी जर महाराष्ट्रातून लढले तर भाजपाला दोन-चार जागा मिळू शकतील. नितीन गडकरींचे तिकिट कापून, त्यांचा काटा काढून नागपूर किंवा पुण्यातून लढण्याचा पंतप्रधान मोदींचा विचार आहे. उद्धव ठाकरे, शरद पवार आणि काँग्रेस एकत्र येऊन ४० हून अधिक जागा जिंकत आहेत. म्हणून मोदींना महाराष्ट्रात आणून निवडणूक लढविण्याची गळ घातली जात आहे", असा दावा संजय राऊत यांनी केला."मी फडणवीस यांना पुन्हा सांगतो, संत तुकाराम यांचे अभंग त्यांनी मनापासून वाचावेत. 'ऐसा नरा, मोजुनी माराव्या पैजारा...' हा अभंग बेईमान लोकांसाठी आहे", असेही संजय राऊत यांनी सांगितले.निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त अरुण गोयल यांनी तडकाफडकी राजीनामा दिल्यानंतर संजय राऊत यांनी टीका केली आहे. "निवडणूक आयोग हा भाजपाच्या इशाऱ्यावर काम करत आहेसंविधानानुसार काम केले पाहीजे. मागच्या १० वर्षात निवडणूक आयोगाचेही खासगीकरण झालेले असून ती भाजपाची एक शाखा बनली आहे", अशी टीका संजय राऊत यांनी केली.

# जिंकण्याची क्षमता असेल तरच जागा मागा : अमित शहा

## जागावाटपासंदर्भात कोणतीही तडजोड करणार नाही

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बिहारमध्ये लोकसभा निवडणुकीची गणिते फसल्यामुळे भाजपला आता महाराष्ट्रावर अधिकाधिक अवलंबून राहावे लागणार आहे. त्यामुळे भाजप महायुतीतील शिंदे व पवार गटासोबत जागावाटपासंदर्भात कोणतीही तडजोड करण्यास तयार नाही.**



जिंकण्याची क्षमता या एकाच गृहमंत्री अमित शहा यांनी शुक्रवारी दिल्लीत झालेल्या महायुतीच्या बैठकीत दिल्याचे समजते.आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपला कुठल्याही परिस्थितीमध्ये ३७० जागांचा आकडा पार करायचा आहे. त्यामुळे जिंकेल त्याला उमेदवारी या सूत्रानुसार भाजपने पहिल्या यादीतील उमेदवारांची घोषणा केली होती. सहा वाजल्यानंतर केंद्रीय निवडणूक समितीची बैठक होणार असून दुसऱ्या यादीमध्ये महाराष्ट्र, बिहार, कर्नाटक, आंध्र प्रदेश आदी आघाड्यांच्या राज्यातील भाजपचे उमेदवार घोषित केले जाणार आहेत.

भाजपसाठी दुसरी यादी सर्वात महत्त्वाची मानली जात असून इथेही जिंकण्याचे सूत्रच अवलंबले जाणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही एकनाथ शिंदे गट व अजित पवार यांना अधिक जागा पदरात पाडून घ्यायच्या असतील तर त्यांच्या उमेदवारांची जिंकण्याची खात्री भाजपला द्यावी लागेल.

महाराष्ट्रातील ४८ जागांपैकी भाजपकडून ३२ ते ३६ जागा लढवल्या जाऊ शकतात तर, शिवसेनेच्या शिंदे गटाला ८-१० तर, राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाला ६-८ जागा दिल्या जाऊ शकतात. शुक्रवारी शहा यांच्या दिल्लीतील निवासस्थानी अडीच तास झालेल्या बैठकीमध्ये शिंदे गटाने १३ तर, अजित पवार गटाने दहा जागांची मागणी केल्याचे समजते.

### जागावाटपाचा तिढा सुटू शकलेला नाही

» मात्र, भाजप महायुतीतील मित्र पक्षांची मागणी मान्य करून जिंकण्याच्या क्षमतेबाबत तडजोड करण्यास नकार दिला आहे. त्यामुळे महायुतीच्या नेत्यांची शहांशी दोनवेळा बैठक होऊनही जागावाटपाचा तिढा सुटू शकलेला नाही. पुढील दोन दिवसांमध्ये दिल्लीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पुन्हा बैठक होण्याची शक्यता आहे.

# 2019ची निवडणूक सर्वात महाग निवडणूक!

## संजय राऊतांनी मांडलं गणित; पंतप्रधान मोदींवर टीकास्त्र!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**निवडणूक आयुक्त अरुण गोयल यांनी राजीनामा दिल्यानंतर २०१४च्या निवडणुकांमध्ये या मुद्द्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यातच विरोधकांकडून सातत्याने निवडणुकांसाठी वापरले जाणारे व्हीव्हीपॅट व निवडणुकांवर होणारा खर्च या मुद्द्यांवरून रान उठवलं जात आहे. यासंदर्भात ठाकरे गटाचे खासदार आणि मुख्य प्रवक्ते संजय राऊत यांनी सामनातील त्यांच्या 'रोखठोक' या सदरात पंतप्रधान नरेंद्र मोदी व भारतीय जनता पक्षावर परखड शब्दांत हल्लाबोल केला आहे. तसेच, निवडणूक रोख्यांसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांवरूनही त्यांनी केंद्र सरकारला लक्ष्य केलं आहे.**



"सर्वोच्च न्यायालयाने इलेक्टोरल बॉण्ड्सचा धंदाच बंद केला. देशातील अदानींसारखे 'मोदी मित्र', बडे उद्योगपती, ठेकेदार वगैरेंनी परदेशी कंपन्यांच्या माध्यमातून इलेक्टोरल बॉण्डस् खरेदी करून भाजपच्या खात्यात हजारो कोटी टाकले असतील तर उद्योगपतींनी हा दानधर्म भाजपलाच का केला? इतरांना हे दान का नाही? भाजपच्या खात्यात ज्या कंपन्यांनी हजारो कोटी टाकले, त्यातील ३५० कंपन्यांवर 'ईडी', 'सीबीआय'ने कारवाई केली आहे. त्यांच्यावर धाडी पडल्या आहेत व ब्लॅकमेल करून त्या कंपन्यांकडून 'खंडणी' स्वरूपात निधी उकळला. हा एक प्रकारे आर्थिक गुन्हाच नाही काय?" असा सवाल संजय राऊतांनी उपस्थित केला आहे."मोदी सरकारचे आर्थिक घोटाळे हा संशोधनाचा विषय आहे. गेल्या सात वर्षांत मोदी सरकारने आपल्या उद्योगपती मित्रांचे ११ लाख कोटींचे कर्ज माफ केले आहे. यात पंधरा लोकांचेच पाच लाख कोटी आहेत. ज्यांचे हे ११ लाख कोटी रुपये माफ केले त्या उद्योगपतींनी भाजपच्या खात्यात किती हजार कोटी 'दान' दिले? जाणकार सांगतात, कर्ज माफ केलेल्या उद्योगपतींनी 'सिंडिकेट' करून २५०० कोटींचे इलेक्टोरल बॉण्डस् खरेदी करून भाजपच्या खात्यात 'भर' घातली. हे सत्य असेल तर तो देशद्रोहासारखाच अपराध आहे", असा मुद्दा संजय राऊतांनी उपस्थित केला आहे."काळा पैसा भाजपच्या खात्यात व निवडणूक प्रचारात जिरवण्यासाठीच निवडणूक रोख्यांचा खटाटोप होता, हे आता सिद्ध होत आहे. असे ठामपणे बोलले जाते की, भारतातील २०१९ ची लोकसभा निवडणूक ही आतापर्यंतची सगळ्यात महाग निवडणूक होती व या निवडणुकीत भाजपने किमान २७ हजार कोटी रुपये खर्च केले. म्हणजे प्रत्येक मतदारावर ७०० रुपये खर्च केले व प्रत्येक लोकसभा मतदारसंघावर १०० कोटी खर्च केले. २० हजार कोटी प्रचारावर, ३ हजार कोटी सोशल मीडियावर आणि ४ हजार कोटी फक्त लॉजिस्टिकवर खर्च झाले", असं गणित मांडून संजय राऊतांनी भारतीय जनता पक्षावर गंभीर आरोप केले आहेत."सर्वोच्च न्यायालयाने इलेक्टोरल बॉण्ड्सचा धंदाच बंद केला. देशातील अदानींसारखे 'मोदी मित्र', बडे उद्योगपती, ठेकेदार वगैरेंनी परदेशी कंपन्यांच्या माध्यमातून इलेक्टोरल बॉण्डस् खरेदी करून भाजपच्या खात्यात हजारो कोटी टाकले असतील तर उद्योगपतींनी हा दानधर्म भाजपलाच का केला? इतरांना हे दान का नाही? भाजपच्या खात्यात ज्या कंपन्यांनी हजारो कोटी टाकले, त्यातील ३५० कंपन्यांवर 'ईडी', 'सीबीआय'ने कारवाई केली आहे. त्यांच्यावर धाडी पडल्या आहेत व ब्लॅकमेल करून त्या कंपन्यांकडून 'खंडणी' स्वरूपात निधी उकळला. हा एक प्रकारे आर्थिक गुन्हाच नाही काय?" असा सवाल संजय राऊतांनी उपस्थित केला आहे."मोदी सरकारचे आर्थिक घोटाळे हा संशोधनाचा विषय आहे. गेल्या सात वर्षांत मोदी सरकारने आपल्या उद्योगपती मित्रांचे ११ लाख कोटींचे कर्ज माफ केले आहे. यात पंधरा लोकांचेच पाच लाख कोटी आहेत. ज्यांचे हे ११ लाख कोटी रुपये माफ केले त्या उद्योगपतींनी भाजपच्या खात्यात किती हजार कोटी 'दान' दिले? जाणकार सांगतात, कर्ज माफ केलेल्या उद्योगपतींनी 'सिंडिकेट' करून २५०० कोटींचे इलेक्टोरल बॉण्डस् खरेदी करून भाजपच्या खात्यात 'भर' घातली. हे सत्य असेल तर तो देशद्रोहासारखाच अपराध आहे", असा मुद्दा संजय राऊतांनी उपस्थित केला.

### दानधर्म भाजपलाच का केला?

» "सर्वोच्च न्यायालयाने इलेक्टोरल बॉण्ड्सचा धंदाच बंद केला. देशातील अदानींसारखे 'मोदी मित्र', बडे उद्योगपती, ठेकेदार वगैरेंनी परदेशी कंपन्यांच्या माध्यमातून इलेक्टोरल बॉण्डस् खरेदी करून भाजपच्या खात्यात हजारो कोटी टाकले असतील तर उद्योगपतींनी हा दानधर्म भाजपलाच का केला? इतरांना हे दान का नाही? भाजपच्या खात्यात ज्या कंपन्यांनी हजारो कोटी टाकले, त्यातील ३५० कंपन्यांवर 'ईडी', 'सीबीआय'ने कारवाई केली आहे. यात पंधरा लोकांचेच पाच लाख कोटी आहेत. ज्यांचे हे ११ लाख कोटी रुपये माफ केले त्या उद्योगपतींनी भाजपच्या खात्यात किती हजार कोटी 'दान' दिले? जाणकार सांगतात, कर्ज माफ केलेल्या उद्योगपतींनी 'सिंडिकेट' करून २५०० कोटींचे इलेक्टोरल बॉण्डस् खरेदी करून भाजपच्या खात्यात 'भर' घातली. हे सत्य असेल तर तो देशद्रोहासारखाच अपराध आहे", असा मुद्दा संजय राऊतांनी उपस्थित केला आहे."काळा पैसा भाजपच्या खात्यात व निवडणूक प्रचारात जिरवण्यासाठीच निवडणूक रोख्यांचा खटाटोप होता, हे आता सिद्ध होत आहे.

# मग मी मंत्री होणार हे निश्चित : रामदास आठवले

## नरेंद्र मोदींनी नवीन संसद भवनाला 'संविधान सदन' हे नाव दिलं

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**२०२४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये आपल्या विजयाचे आणि समोरच्या पक्ष किंवा आघाडीच्या पराभवाचे दावे सगळेच करताना दिसत आहेत. राजकीय वर्तुळात सध्या जागावाटप व आघाडी-युतीमध्ये समावेशाच्या चर्चा-बैठका होताना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर २०२४ नंतर नेमकं काय होणार? यावर रिपाइंचे अध्यक्ष व केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी दावा केला आहे.**

मुंबईत एका कार्यक्रमासाठी आलेले रामदास आठवले यांनी यादरम्यान बोलताना आगामी राजकीय भवितव्याविषयी भाष्य केलं आहे.केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी याआधीच २०२४ च्या निवडणुकांमध्ये मोदींसह एनडीएमध्येच राहणार असल्याचं स्पष्ट केलं आहे. त्यापाठोपाठ आता त्यांनी त्यांच्या मंत्रीपदाचीही घोषणा केली आहे. २०२४ च्या निवडणुकांनंतर आपण मंत्री होणार असल्याचं ते म्हणाले आहेत. त्यामुळे राजकीय तर्क-वितर्कांना उधाण आलं आहे.यावेळी रामदास आठवले यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपा सरकार भारताचं संविधान



बदलणार असल्याच्या आरोपांना प्रत्युत्तर दिलं."नरेंद्र मोदींनी नवीन संसद भवनाला 'संविधान सदन' हे नाव दिलं आहे. २६ नोव्हेंबर हा दिवस देशभर संविधान दिन म्हणून देशभर पाळण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे असे मोदी संविधान बदलणं शक्य नाही. संविधानाचं संरक्षण करण्यासाठी आपण सगळे आहोतच", अशा शब्दांत रामदास आठवले यांनी मोदींना समर्थन दिलं आहे."नरेंद्र मोदी अनेकदा इथे आले. भारत सरकारच्या वतीने हजारो कोटींची मदत मुंबई-महाराष्ट्राला दिली आहे. आघाडीच्या पराभवाचे दावे सगळेच करताना दिसत आहेत. राजकीय वर्तुळात सध्या जागावाटप व आघाडी-युतीमध्ये समावेशाच्या चर्चा-बैठका होताना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर २०२४ नंतर नेमकं काय होणार? यावर रिपाइंचे अध्यक्ष व केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी दावा केला आहे.

### 2024 नंतर नेमकं काय होणार?

» एकीकडे लोकसभा निवडणुकांच्या उमेदवार निश्चितीची प्रक्रियाही अद्याप पूर्ण झालेली नसताना रामदास आठवलेंनी त्यांच्या मंत्रीपदाबाबत विश्वास व्यक्त केल्याचं पाहायला मिळत आहे.२०२४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये आपल्या विजयाचे आणि समोरच्या पक्ष किंवा आघाडीच्या पराभवाचे दावे सगळेच करताना दिसत आहेत. राजकीय वर्तुळात सध्या जागावाटप व आघाडी-युतीमध्ये समावेशाच्या चर्चा-बैठका होताना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर २०२४ नंतर नेमकं काय होणार? यावर रिपाइंचे अध्यक्ष व केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी दावा केला आहे.

# टायगर श्रॉफ चेहरा लपवत आले माध्यमांसमोर

बॉलीवूडचा सुपरस्टार अक्षय कुमार आणि टायगर श्रॉफ यांचा आगामी चित्रपट 'बडे मियाँ छोटे मियाँ' ईदच्या मुहूर्तावर प्रदर्शित होणार आहे. दोन्ही स्टार्स वेगवेगळ्या शहरांत जाऊन या चित्रपटाचे दणक्यात प्रमोशन करताना दिसतायत. अनेकदा माध्यमांसमोर येताना आपण अक्षय आणि टायगरला वेगवेगळ्या रूपांत पाहिलंच असेल; पण आज दोघंही माध्यमांसमोर येताना आपला चेहरा लपवत आले होते. या दोघांचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय. बडे मियाँ अक्षय कुमार आणि छोटे मियाँ टायगर श्रॉफचा एक व्हिडीओ समोर आला आहे. त्यात अक्षय आणि टायगरने पापाराझींसमोर येताच आपला चेहरा झाकला आणि लपत लपत ते माध्यमांसमोर आले. अक्षय आणि टायगरच्या अशा वागण्यामुळे सगळेच गोंधळात पडले.

अशातच एकानं विचारलं, "नक्की काय झालं सर?" तेवढ्यात दुसरा पापाराझी म्हणाला, "हा नक्कीच ट्रेंड आहे." त्यानंतर हसत हसत अक्षय आणि टायगरनं एकमेकांना मिठी मारली. अशा प्रकारे दोघांनी पापाराझींबरोबर प्रँक केला, असं लक्षात आलं.व्हायरल झालेल्या या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत, "खिलाडीशिवाय अशी मस्करी कोणीच करू शकत नाही." अशी कमेंट एकानं केली. तर, काही जण म्हणाले, "चेहरा लपवावा लागेल, असं कामच का करायचं?"दरम्यान, अक्षय कुमार आणि टायगर श्रॉफ अभिनीत 'बडे मियाँ छोटे मियाँ' चित्रपट १२ मार्च रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# सैनिकांच्या शौर्याची गाथा सांगणारा 'योद्धा'

भारताच्या सुरक्षिततेची शपथ घेतलेला सैनिक आपले कर्तव्य पूर्ण करण्यासाठी वेळप्रसंगी आपल्या प्राणांची आहुती देऊ शकतो आणि शत्रूचा जीवही घेऊ शकतो. भारतीय सैनिकांच्या शौर्याची गाथा सांगणारा 'योद्धा' हा अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा याचा आगामी चित्रपट १५ मार्च रोजी संपूर्ण भारतात प्रदर्शित होणार आहे. एका प्रवासी विमानाचे अपहरण करण्यात आल्यानंतर त्यातील प्रवाशांना सुखरूप बाहेर काढत अपहरण करणाऱ्या दहशतवाद्यांना अद्दल घडवणाऱ्या सैनिकाची कथा या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. करण जोहर निर्मित या चित्रपटाचं दिग्दर्शन सागर आंब्रे आणि पुष्कर ओझा यांनी केलं असून राशी खन्ना, दिशा पटानी आणि रोनीत रॉय यांच्या यात प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटाच्या ट्रेलर प्रदर्शनाच्या निमित्ताने अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा याने प्रसिद्धीमाध्यमांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या.या चित्रपटाबद्दल आणि आपल्या पात्राबद्दल बोलताना सिद्धार्थ म्हणाला, 'योद्धा या चित्रपटाचा ट्रेलर आम्ही ३७ हजार फूट उंचीवर विमानामध्ये प्रदर्शित केला. विमान हवेत उडत असताना अपहरण करण्यात आले तर त्यातील प्रवाशांच्या मनात उमटणारी भीती कशी असते हे या ट्रेलरच्या माध्यमातून आम्हाला मांडायचे होते. हा चित्रपट एका सैनिकावर आधारित आहे, ज्याचं त्याच्या देशावर फार प्रेम आहे आणि त्या देशाच्या आणि देशातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी तो काहीही करू शकतो'. 'कोणताही चित्रपट करताना त्यातील पात्र आपलंसं वाटणं गरजेचं असतं.

# मिस वर्ल्ड 2024 सोहळा



७१वा 'मिस वर्ल्ड २०२४'चा महाअंतिम सोहळा जिओ वर्ल्ड कन्व्हेकशन सेंटरमध्ये सुरू झाला आहे. १९९६ साली हा सोहळा भारतात झाला होता. तब्बल २८ वर्षांनंतर 'मिस वर्ल्ड २०२४'चा महाअंतिम सोहळा आज भारतात होतं आहे. या सौंदर्यवती स्पर्धेत भारताच प्रतिनिधित्व २२ वर्षांची सिनी शेट्टी करत आहे. त्यामुळे आजची रात्र भारतीयांसाठी खूप महत्त्वाची आहे. सौंदर्य, आत्मविश्वास, सादरीकरण, बुद्धिमत्ताच्या बळावर कोणती सौंदर्यवती बाजी मारून 'मिस वर्ल्ड २०२४'चा किताब मिळवते? याकडे सगळ्यांचं लक्ष लागून राहिलं आहे. 'मिस वर्ल्ड २०२४'चा महाअंतिम सोहळा सुरू झाला असून अनेक बॉलीवूड कलाकार उपस्थित राहिले आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी देखील या सोहळ्याला हजेरी लावली आहे. त्या या स्पर्धेचं परीक्षण करणार आहेत.या स्पर्धेच्या परीक्षणसाठी १२ सदस्याचं पॅनेल आहे. यामध्ये बॉलीवूड अभिनेत्री क्रिती सेनॉन, पूजा हेगडे, मिस वर्ल्ड ऑर्गनायझेशनच्या सीईओ ज्युलिया एव्हलिन मॉर्ले, अमृता फडणवीस, साजिद नाडियाडवाला, माजी भारतीय क्रिकेटपटू हरभजन सिंग यांचा समावेश आहे. हे सदस्य 'मिस वर्ल्ड २०२४'चं परीक्षण करणार आहेत.

# मी दीपिकाला संधी दिली :फराह

२००७ रोजी प्रदर्शित झालेला फराह खानचा 'ओम शांती ओम' चित्रपट अजूनही लोकप्रिय आहे. शाहरुख खान अभिनीत या चित्रपटात नायिकेची भूमिका साकारत दीपिका पदुकोणने हिंदी सिनेसृष्टीत पदार्पण केले. कथानक, संवाद व गाण्यांमुळे हा चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. त्यावेळी 'ओम शांती ओम'ने बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई केली होती. परंतु, 'मॅशेबल इंडिया'ला दिलेल्या मुलाखतीत 'ओम शांती ओम' चित्रपटात दीपिका पदुकोणला फक्त शाहरुख खानमुळे संधी मिळाल्याचे दिग्दर्शिका फराह खानने सांगितले. कास्टिंग दिग्दर्शक मुकेश छाबरा यांच्याशी संवाद साधताना फराह म्हणाली, "नवोदित कलाकारांना केव्हाही संधी मिळू शकते; परंतु तुम्ही या संधीसाठी तयार आहात की नाही हे तुम्हाला माहीत असायला हवं. सगळे जण म्हणतात की, योग्य भूमिका मिळेपर्यंत वाट पाहावी. पण, मला असं वाटतं की, ते दिवस गेलेत आता. लहान-मोठं काम असलं तरी तुम्ही अभिनय करीत राहिलं पाहिजे. तुम्ही स्टारकिड असल्याशिवाय तुम्हाला कोणीही मोठी संधी देणार नाही. सॉरी! पण हेचं सत्य आहे."जेव्हा मुकेश छाबरा यांनी फराह खानला विचारले, "दीपिका पदुकोणसारख्या नवोदितांनाही तुम्ही संधी दिली आहे." तेव्हा फराह म्हणाली, "मी दीपिकाला संधी दिली. कारण- नायकाच्या भूमिकेत शाहरुख खान होता आणि शाहरुखमुळेच मी ती जोखीम पत्करू शकले."दरम्यान, 'ओम शांती ओम' चित्रपटात किरण खेर, श्रेयस तळपदे, अर्जुन रामपाल, युविका चौधरी यांच्याही निर्णायक भूमिका होत्या. 'ओम शांती ओम' चित्रपटानंतर फराह खानने २०१४ रोजी प्रदर्शित झालेल्या 'हॅपी न्यू इयर' चित्रपटात शाहरुख आणि दीपिकाबरोबर पुन्हा काम केले. तर २०२३ रोजी प्रदर्शित झालेल्या पठाण आणि जवान या चित्रपटांमध्ये शाहरुख खान आणि दीपिका पदुकोणने एकत्र काम केले.२००७ रोजी प्रदर्शित झालेला फराह खानचा 'ओम शांती ओम' चित्रपट अजूनही लोकप्रिय आहे. शाहरुख खान अभिनीत या चित्रपटात नायिकेची भूमिका साकारत दीपिका पदुकोणने हिंदी सिनेसृष्टीत पदार्पण केले. कथानक, संवाद व गाण्यांमुळे हा चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. त्यावेळी 'ओम शांती ओम'ने बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई केली होती. परंतु, 'मॅशेबल इंडिया'ला दिलेल्या मुलाखतीत 'ओम शांती ओम' चित्रपटात दीपिका पदुकोणला फक्त शाहरुख खानमुळे संधी मिळाल्याचे दिग्दर्शिका फराह खानने सांगितले. कास्टिंग दिग्दर्शक मुकेश छाबरा यांच्याशी संवाद साधताना फराह म्हणाली.

# दबाव नसतानाही लग्न करण्याचं कारण?



फॅशन आयकॉन मलायका अरोरा सोशल मीडियावर खूप चर्चेत असते. अवघ्या विशीत ती अभिनेता अरबाज खानला भेटली आणि त्याच्या प्रेमात पडली. मग दोघांनी लग्न केलं पण लग्नाच्या १९ वर्षांनंतर दोघे विभक्त झाले. आता एका मुलाखतीत मलायकाने घटस्फोटाचा निर्णय कसा घेतला याबद्दल सांगितलं आहे. इतकंच नाही तर पोटगीचा उल्लेख करत लोकांनी किती वाईट कमेंट्स केल्या, तो प्रसंगही सांगितला. 'पिंकविला'ला दिलेल्या एका मुलाखतीत, मलायकाने तिच्या कुटुंबाकडून कोणताही दबाव नसतानाही २५ व्या वर्षी लग्न करण्यामागचं कारण सांगितलं. "मी अशा कुटुंबात वाढले नव्हते, जिथे 'अरे तुला या वयात लग्न करावं लागेल' असं म्हटलं गेलं. मला हवं तसं आयुष्य जगण्यास सांगितलं होतं. बाहेर जा, जीवनाचा आनंद घे, नवनवीन लोकांना भेट आणि रिलेशनशिपमध्ये राहा, असं सांगण्यात आलं होतं. इतकी मोकळीक असूनही माझ्या डोक्यात काय विचार आले ते मला माहित नाही, मी २२-२३ वर्षांचे असताना म्हणाले की मला लग्न करायचं आहे. माझ्यावर कोणीही लग्नासाठी दबाव आणला नाही पण मला तेच करायचं होतं, कारण त्या क्षणी माझ्याकडे हा सर्वोत्तम पर्याय होता," असं मलायका म्हणाली.मलायकाने कबूल केलं की लग्न झाल्यानंतर अनेक वर्षांनी तिला हे समजलं की तिला आयुष्यात हेच हवं नव्हतं. "जेव्हा मी घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला, तेव्हा मला वाटत नाही की इंडस्ट्रीमध्ये खूप महिला घटस्फोट घेत होत्या आणि आयुष्यात पुढे जात होत्या. मला माझ्यासाठी, माझ्या वैयक्तिक वाढीसाठी, मला माझ्या मुलाला आनंदी ठेवण्यासाठी, मुलाने आयुष्यात काहीतरी करावं यासाठी घटस्फोट हा योग्य पर्याय वाटला, तर मी तेच केलं," असं मलायका म्हणाली.घटस्फोटाकडे लोक तुच्छतेने पाहतात, असंही तिने नमूद केलं. "घटस्फोटानंतर माझ्या आजूबाजूच्या कोणालाही आनंदी करण्यासाठी मी स्थिर आणि आनंदी वाटणं गरजेचं होतं, कारण त्याची सुरुवात माझ्यापासून होते आणि मी तेच केलं," असं मलायकाने नमूद केलं. मलायका सोशल मीडियावर खूप लोकप्रिय आहे. मलायकाने सांगितलं की एकदा तिने परिधान केलेल्या एका ड्रेसची किंमत असलेली बातमी छापून आली होती, त्यावर खूप वाईट कमेंट्स होत्या. 'इतका महाग ड्रेस मलायकाला परवडू शकतो कारण तिला पोटगीत खूप पैसे मिळाले आहेत,' अशी एक कमेंट होती. ती पाहून मला धक्का बसला. या कमेंट्स पाहून मला इतकंच वाटलं की तुम्ही आयुष्यात कोणत्याही स्तरावर काहीही केले तरी त्याचा काही फरक पडत नाही, असं ती म्हणाली.फॅशन आयकॉन मलायका अरोरा सोशल मीडियावर खूप चर्चेत असते. अवघ्या विशीत ती अभिनेता अरबाज खानला भेटली आणि त्याच्या प्रेमात पडली. मग दोघांनी लग्न केलं पण लग्नाच्या १९ वर्षांनंतर दोघे विभक्त झाले.

# श्रीलंका संघाचं अनोख सेलिब्रेशन!

## » बांग्लादेशला ‘टाईम आऊट’ वादाची करून दिली आठवण

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**श्रीलंका आणि बांगलादेश यांच्यातील सामनाही हाय व्होल्टेज होऊ लागला आहे. श्रीलंकेने शनिवारी ९ मार्चला बांगलादेशविरुद्धची टी-२० मालिका जिंकल्यानंतर श्रीलंकेच्या संघाने ट्रॉफीसह पोज देताना ‘टाइम-आउट’ सेलिब्रेशन केले. विश्वचषक २०२३ मध्ये श्रीलंका आणि बांगलादेश यांच्यातील सामन्यादरम्यान टाइमआउटचा वाद चर्चेत होता. बांग्लादेशच्या निर्णयामुळे श्रीलंकेचा खेळाडू अँजेलो मॅथ्यूज टाइम-आउटमुळे बाद होणारा पहिला खेळाडू ठरला.**




श्रीलंकेने मालिकेतील तिसरा आणि शेवटचा सामना २८ धावांनी जिंकून मालिका २-१ अशी खिशात घातली आणि अनोख्या सेलिब्रेशनसह त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांना डिवचले. श्रीलंकेने त्यांच्या इंस्टाग्रामवर ट्रॉफीसह एक फोटो पोस्ट केला, ज्यात सर्व खेळाडू त्यांच्या डाव्या हाताच्या मनगटाकडे इशारा करताना दिसले, जे काल्पनिक घड्याळ दर्शवते.भारतातील विश्वचषक २०२३ दरम्यान टाइम-आउट संदर्भात दोन्ही संघांमध्ये वाद सुरू झाला होता, जेव्हा अँजेलो मॅथ्यूज वेळेवर मैदानावर न पोहोचल्यामुळे त्याला बाद करण्यात आले होते. आता श्रीलंकेने पुन्हा एकदा टाईम आऊट मुद्द्यावरून बांग्लादेश संघाला डिवचलं आहे.खेळाडूंनी ही पोज देताच श्रीलंकेच्या हजारो चाहत्यांनी एकत्र येऊन घोषणाबाजी सुरू केली. चाहत्यांनी खेळाडूंच्या समर्थनार्थ येऊन बांगलादेशला चिडवले. त्यामुळे सोशल मीडियावर पुन्हा वातावरण तापले. विश्वचषकानंतर या दोन्ही संघांमध्ये एकमेकांबद्दल अधिक कटुता निर्माण झाली आहे. विश्वचषकापूर्वीही जेव्हा जेव्हा श्रीलंका आणि बांगलादेश यांच्यात सामना व्हायचा तेव्हा तो असाच हाय व्होल्टेजचा होत असे.३ सामन्यांच्या टी-२० मालिकेतील शेवटच्या सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या श्रीलंकेच्या संघाला २० षटकांत ७ गडी गमावून १७४ धावा करता आल्या. कुसल मेंडिसने ५५ चेंडूत ८६ धावांची शानदार खेळी केली. यादरम्यान त्याने ६ चौकार आणि ६ षटकारही मारले. प्रत्युत्तरात फलंदाजीला आलेला बांगलादेशचा संघ अवघ्या १४६ धावांत सर्वबाद झाला आणि सामना २८ धावांनी गमावला. या विजयासह श्रीलंकेने ही मालिकाही २-१ ने जिंकली आहे. नुवान तुषाराने आपल्या सनसनाटी गोलंदाजीवर हॅटट्रिक मिळवली. तुषाराने कौशल्य आणि अचूकतेच्या जोरावर ॅमहमुदुल्लाला LBW बाद करून आपली हॅटट्रिक साधली. तुषाराची हॅट्रिक हा सामन्याला कलाटणी देणारा क्षण होता, ज्यामुळे बांगलादेशच्या पुनरागमनाच्या कोणत्याही आशा संपुष्टात आल्या. यजमानांच्या प्रयत्नांनंतरही, त्यांना या धक्क्यातून सावरता आले नाही आणि शेवटी श्रीलंकेने दिमाखदार विजय मिळवला.श्रीलंकेने मालिकेतील तिसरा आणि शेवटचा सामना २८ धावांनी जिंकून मालिका २-१ अशी खिशात घातली आणि अनोख्या सेलिब्रेशनसह त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांना डिवचले. श्रीलंकेने त्यांच्या इंस्टाग्रामवर ट्रॉफीसह एक फोटो पोस्ट केला, ज्यात सर्व खेळाडू त्यांच्या डाव्या हाताच्या मनगटाकडे इशारा करताना दिसले, जे काल्पनिक घड्याळ दर्शवते.

### बांगलादेशचा संघ 146 धावांत सर्वबाद

» भारतातील विश्वचषक २०२३ दरम्यान टाइम-आउट संदर्भात दोन्ही संघांमध्ये वाद सुरू झाला होता, जेव्हा अँजेलो मॅथ्यूज वेळेवर मैदानावर न पोहोचल्यामुळे त्याला बाद करण्यात आले होते. आता श्रीलंकेने पुन्हा एकदा टाईम आऊट मुद्द्यावरून बांगलादेश संघाला डिवचलं आहे.खेळाडूंनी ही पोज देताच श्रीलंकेच्या हजारो चाहत्यांनी एकत्र येऊन घोषणाबाजी सुरू केली. चाहत्यांनी खेळाडूंच्या समर्थनार्थ येऊन बांगलादेशला चिडवले. त्यामुळे सोशल मीडियावर पुन्हा वातावरण तापले. विश्वचषकानंतर या दोन्ही संघांमध्ये एकमेकांबद्दल अधिक कटुता निर्माण झाली आहे. विश्वचषकापूर्वीही जेव्हा जेव्हा श्रीलंका आणि बांगलादेश यांच्यात सामना व्हायचा तेव्हा तो असाच हाय व्होल्टेजचा होत असे.३ सामन्यांच्या टी-२० मालिकेतील शेवटच्या सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या श्रीलंकेच्या संघाला २० षटकांत ७ गडी गमावून १७४ धावा करता आल्या. कुसल मेंडिसने ५५ चेंडूत ८६ धावांची शानदार खेळी केली. यादरम्यान त्याने ६ चौकार आणि ६ षटकारही मारले. प्रत्युत्तरात फलंदाजीला आलेला बांगलादेशचा संघ अवघ्या १४६ धावांत सर्वबाद झाला.

# फिटनेस कसा राखायचा अँडरसनकडून शिकायला हवे

## » बुमराहला विकेट्स घेणे आणि यशस्वी होण्याचे चावी माहित आहे

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांची कसोटी मालिका शनिवारी धरमशाला येथे पार पडली. या मालिकेतील शेवटचा आणि पाचवा सामना जिंकून टीम इंडियाने मालिका ४-१ ने खिशात घातली. या सामन्यादरम्यान इंग्लंडचा वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसनने आपल्या ७०० कसोटी विकेट्स पूर्ण केल्या. यानंतर ग्लेन मॅकग्राने त्याचे कौतुक करताना मोहम्मद शमीला त्याच्याकडून शिकण्याचा सल्ला दिला आहे.**






महान ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज ग्लेन मॅकग्राचे मत आहे की भारताच्या सध्याच्या वेगवान आक्रमणाकडे अजूनही बरेच काही देण्यासारखे बाकी आहे. त्यामुळे मोहम्मद शमीने इंग्लंडच्या जेम्स अँडरसनकडून दीर्घ कारकीर्दीसाठी शिकले पाहिजे. एमआरएफ पेस फाऊंडेशनच्या कार्यक्रमावेळी पीटीआयशी बोलताना मॅकग्रा म्हणाले, “आपल्याला वेगवान गोलंदाजांच्या पुढील पिढीची वाट पाहावी लागेल. जसप्रीत बुमराहकडे अजून बराच वेळ आहे. मोहम्मद शमी म्हातारा होत चालला आहे, पण त्याच्यात अजून खूप क्रिकेट बाकी आहे. सध्याचे भारतीय गोलंदाजी आक्रमण अजूनही खूप काही देऊ शकते.ग्लेन मॅकग्रा पुढे म्हणाले,“भारतीय गोलंदाजी उत्कृष्ट आहे. मोहम्मद शमीकडे नियंत्रण आणि वृत्ती दोन्ही आहे आणि तो परिस्थितीशी झटपट जुळवून घेतो. मोहम्मद सिराज चांगला खेळत आहे. जसप्रीत बुमराहही संघात आहे. भारताकडे चांगले वेगवान आक्रमण आहे.” मोहम्मद शमी पायाच्या स्नायूंच्या शस्त्रक्रियेमुळे इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत खेळू शकला नाही.जसप्रीत बुमराह जगातील तीन सर्वोत्तम वेगवान गोलंदाजांपैकी एक आहे का? असे विचारले असता यावर ग्लेन मॅकग्रा म्हणाले, “नक्कीच. शंका नाही. दुखापतीमुळे काही काळ बाहेर राहिल्यानंतर त्याने शानदार पुनरागमन केले.

### इंडियाने मालिकाने खिशात घातली

» जसप्रीत बुमराहला विकेट्स घेणे आणि यशस्वी होण्याचे चावी माहित आहे.”ग्लेन मॅकग्रा म्हणाले की,“मोहम्मद शमीने वाढत्या वयात फिटनेस कसा राखायचा हे जेम्स अँडरसनकडून शिकायला हवे. हे अवघड आहे, पण शमीसारख्या गोलंदाजाकडे अनुभव आहे. वाढत्या वयातही चांगली कामगिरी करण्यासाठी कठोर सराव, तयारी आणि प्रेरणा आवश्यक असते. जेम्स अँडरसनकडे पाहा जो ४१ वर्षांचा आहे, परंतु त्याने ७०० वी कसोटी विकेट घेतली आहे आणि चांगली गोलंदाजी करत आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांची कसोटी मालिका शनिवारी धरमशाला येथे पार पडली. या मालिकेतील शेवटचा आणि पाचवा सामना जिंकून टीम इंडियाने मालिका ४-१ ने खिशात घातली.